# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/03/2023 (गुरूवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत किसन कन्हैया सोसायटी वार्ड नं ३ बुट्टीबोरी येथे फिर्यादी नामे— आशिष यशवंत लोडे, वय ३४ वर्ष, रा. किसन कन्हैया सोसायटी वार्ड नं. ०३ बोरी हे आपले परिवारासह गावाला गेले असता नमुद घटना तारिख वेळ व ठिकाणी कोणीतरी अज्ञात आरोपीनी घराचे दाराचे कुलुप कोंडा तोडुन घरात प्रवेश करून आलमारीत ठेवलेले सोने चांदीचे दागिने त्यामध्ये १) सोन्याची गळयातील साखळी किंमती अंदाजे ५,०००/— रू २) सोन्याचे कानातले खडे किंमती अंदाजे २,००० रू ३) एक सोन्याची जिवती किंमती अंदाजे ५००/— रू ४) सोन्याचे मनी १३ नग किंमती अंदाजे ५,०००/— रू ५) चांदीच्या पायपट्टया, ईतर चांदीचे दागिने किंमती अंदाजे २,०००/— रू ६) एक मोबाईल सॅमसंग कंपनीचा किंमती अंदाजे ५००/— रू ७) नगदी ५,०००/— रू. असा एकुण २०,००० रूपयाचा मुद्देमाल मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१४९१ टेकाम मो. नं. ९०२१००७३२१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा बोरडा गणेशी येथे फिर्यादी नामे— नरेद्र गोंविंदराव ठाकरे वय ४२ वर्ष रा. बोरडा गणेशी बोरडा गणेशी ग्रामपंचायत उपसरपंच यांना ग्रामपंचायत चपराशी यांनी फोन करुन सांगीतले की नाल्याचे पाणी थांबविण्यासाठी बंधाऱ्याला लावलेले जुने वापरते लोखंडी तरापे दिसुन येत नाही अशी माहिती दिल्या वरुन फिर्यादी यांनी ग्रामपंचायत सरपंच, ग्रमसेवक व इतर सदस्य यांच्या सोबत घटनास्थळी जावुन पाहिले असता फिर्यादीला नाल्याचे पाणी थांबविण्यासाठी बंधा—याला लावलेले लोंखडी तरापे जुने वापरते २० नग किंमती अंदाजे ५०० रु प्रती नग प्रमाणे एकुण १०,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रवीण चव्हाण/२८८ मो न. ७०२०३५०००१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर